# संपादकीय

## एकनाथ शिंदेंना शह ?

राजकारणात कधी कोणाचे पारडे जड असेल आणि कधी कुणाचे पारडे खाली येईल, हे सांगता येत नाही. महायुती किंवा महाविकास आघाडीतही कुरघोड्यांच्या राजकारणात हेच चित्र दिसते. आघाडीत तर वापरा आणि फेकून द्या, हेच तंत्र अवलंबिले जाते. अगदीच तसे नाही झाले तरी गरज संपली की, मित्र पक्षांचेही खच्चीकरण केले जाते अथवा सत्ताधारी अशा मित्र पक्षांची ताकद कमी करण्याच्या दृष्टीने राजकारण करीत असतात. याचा अनुभव सध्या माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या शिवसेनेला येत असेल. निवडणुका होईपर्यंत शिंदे आणि त्यांच्या पक्षाला गोंजारणाऱ्या भाजप नेत्यांनी निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकल्यानंतर आपले खरे रंग दाखवायला सुरुवात केली आहे. अर्थात महाराष्ट्रात भाजप, शिंदे सेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीसह घटक पक्षांसह महायुतीची सत्ता आहे. महायुतीचे सरकार असले तरी भाजपचे संख्याबळ अधिक असल्याने मुख्यमंत्रीपदही भाजपच्या पारड्यात पडले. सुरुवातीला एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी आग्रह धरला होता, पण भाजप नेत्यांच्या ताठर भूमिकेमुळे शिंदेंना उपमुख्यमंत्री पदावर समाधान मानावे लागले. मंत्रिमंडळाच्या खाते वाटपातही शिंदेंना गृहखाते मिळावे, अशी अपेक्षा होती, पण तीही त्यांची इच्छा डावलण्यात आली. त्यांना दुसरे महत्त्वाचे नगरविकास खाते देण्यात आले. मुख्यमंत्रीपदावरून सुरू झालेले शिंदे यांचे नाराजीनाट्य अद्याप सुरू असल्याची चर्चा आहे. कारण देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यापासून शिंदेंचे पंख छाटण्याची एकही संधी सोडली नाही, असे त्यांच्या समर्थकांचे मत आहे. सोमवारी देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन समितीतून एकनाथ शिंदे यांना वगळले. अजित पवार यांना मात्र समितीत मानाचे स्थान देण्यात आले.यावरुन शिंदे व त्यांच्या पक्षाचे आमदार नाराज होताच दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी या निर्णयाचा फेरविचार करुन शिंदेंची वर्णी पुन्हा आपत्ती व्यवस्थापन समितीवर लावली गेली आहे.काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी एक निर्णय घेतला होता. एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. खरे तर हे पद भरत गोगावले यांच्याकडे होते. ते मंत्री झाल्याने त्यांच्याकडील हे पद काढून घेण्यात आले. असे असले तरी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे हे पद देता आले असते. तसे न करता जुना नियम फडणवीसांनी लागू केला. म्हणजे ज्येष्ठ सनदी अधिकाऱ्यांकडे एसटी महामंडळाचे अध्यक्षपद दिले. अजित पवारही उपमुख्यमंत्री आहेत. त्यांच्याकडेही महत्त्वाचे अर्थ खाते आहे. तरीही ते महसूल, मदत व पुनर्वसन, आपत्ती, व्यवस्थापन आणि आरोग्य मंत्री समितीवर आहेत. मुख्यमंत्री असताना शिंदेंनी सुरू केलेल्या अनेक योजना बंद करण्याचा घाटच देवेंद्र फडणवीस यांनी घातल्याचे म्हटले जाते. निवडणुकीआधी शिंदे यांनी लाडकी बहीण योजना सुरू केली. त्याचा लाभ युतीच्या उमेदवारांना नक्कीच झाला. महिला मतदारांची संख्या वाढली. मात्र आता सरकारने लाडक्या बहिणींच्या यादीलाच कात्री लावण्यास सुरुवात केली आहे. पहिल्या टप्प्यात पाच लाख आणि दुसऱ्या टप्प्यात पाच लाख अशा एकूण दहा लाख लाडक्या बहिणींना योजनेतून वगळण्यात येणार आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या या महत्त्वपूर्ण योजनेबाबत महिलांमध्ये नाराजीचा सूर आहे. त्याचबरोबर शिंदे यांनी घेतलेल्या आनंदाचा शिधा, शिवभोजन थाळी आणि तीर्थदर्शन योजना बंद करण्याच्या निर्णयापर्यंत सरकार आले आहे. मात्र या योजना बंद होणार नाहीत, असे शिंदे यांचे विश्वासू परिवहन मंत्री प्रताप सरनाईक सांगत आहेत. नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्री पदाच्या नियुक्तीवरूनही नाराजीचा सूर उमटत आहे. या पालकमंत्री पदाच्या नियुक्तीला फडणवीस आणि स्थगिती दिली आहे. रायगडचे पालकमंत्रीपद एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला न देता आपणच बॉस असल्याचे त्यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात तसेच उद्योग विभागाच्या काही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय परस्पर प्रशासकीय पातळीवर घेत असल्याबाबत उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रातून नाराजी व्यक्त केली आहे. धोरणात्मक निर्णय, महत्त्वाच्या कामकाजाबाबत सचिव तसेच मुख्य अधिकारी, कार्यकारी अधिकारी यांनी नियमित ब्रीफिंग होईल, याची दक्षता घ्यावी, असा सज्जड दमच या पत्रातून अधिकाऱ्यांना भरला आहे. अधिकारी परस्पर कारभार करतात, मंत्र्यांनाही विश्वासात घेत नसल्याने शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र यावर नेहमीप्रमाणे आपण नाराज नसल्याचे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. त्यातच उदय सामंत यांनी स्वतःच्याच उद्योग खात्यातील प्रधान सचिव आणि सीईओ यांच्याजवळ नाराजी व्यक्त करीत पत्र लिहिल्याचे म्हटले जाते. या वृत्तानंतर उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेत आपण नाराज नसल्याचे सांगितले. दुसरीकडे एकनाथ शिंदे फडणवीस यांच्या निर्णयामुळे नाराज असल्याची चर्चा आहे. मंगळवारी मुंबई व ठाणे जिल्ह्याची वार्षिक बैठक होती. पालकमंत्री या नात्याने शिंदे यांनी त्या बैठकीला उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु त्यांनी बैठकच रद्द केली. त्यामागचे कारण त्यांनी स्पष्ट केले नाही. महायुतीमध्ये तीन-तीन पक्ष असल्याने तीनही पक्षांच्या कार्यकर्त्यांना खुश ठेवणे कठीण झाले आहे. फडणवीस भाजप कार्यकर्त्यांना आवरु शकतात, पण शिंदे गट आणि अजित पवार गटांमध्ये पदे देण्याबाबत भाजपसारखी शिस्त दिसत नाही. भाजपमध्ये एक व्यक्ती एक पद हा फॉर्म्युला राबविला जातो. आता पदे कमी आणि मागणारे जास्त झाल्याने संपूर्ण महायुतीला हा फॉर्मुला लागू करण्याचा फडणवीस यांचा प्रयत्न सुरू आहे. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यात आणि शिंदे यांच्यात दुरावा वाढत चालल्याचे चित्र आहे. मुख्यमंत्री फडणवीस प्रत्येक बाबतीत हस्तक्षेप करीत आपणच सरकारचे बॉस असल्याचे दाखवून देत आहेत. शिंदेंपेक्षा आता अजित पवार फडणवीस यांच्या अधिक जवळचे असल्याचे दिसत आहे. यावरून शिंदे यांचे पंख छाटण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेच एकूण प्रकारातून दिसून येते.

## क्रॉनिक ग्राफ्ट-व्हर्सेस-होस्ट डिसीज (सीजीव्हीएचडी)ने पीडित रूग्णांवर उपचार करण्यासाठी सनोफीच्या महत्वपूर्ण उपचार रेझ्यूरॉकला भारतात मान्यता देण्यात आली

मुंबई, दि. १० : सनोफी हेल्थकेअर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ने भारतात रेझ्यूरॉक (बेल्यूमोस्यूडिल टॅब्लेट्स) साठी विपणन अधिकृतता मिळाल्याचे जाहिर केले आहे. उपचाराचे मागील दोन प्रकार अपयशी ठरल्यानंतर, रेझ्यूरॉक जगभरातील हजारो सीजीव्हीएचडी रूग्णांसाठी (१२ वर्षे आणि त्याहून मोठे) एक नवीन, सर्वोत्तम उपचार उदाहरण दर्शवित आहे, ज्यात तंतुमयता (फायब्रोसिस) सारखे उपचार करणे कठीण प्रादुर्भाव सामील आहेत.

रेझ्यूरॉकला यूएस एफडीए ने (२०२१ मध्ये) आणि भारतातील सीडीएससीओ ने (२०२४ मध्ये) रॉकस्टारच्या सुरक्षा आणि कार्यक्षमतेच्या परिणामांवर आधारित मान्यता दिली होती - रॉकस्टार हे सिस्टमिक उपचाराचे दोन ते पाच आधीचे प्रकार देण्यात आलेल्या सीजीव्हीएचडी ने पीडित रूग्णांमध्ये रेझ्यूरॉकची एक यादृच्छिक, ओपन-लेबल, बहुआयामी खूप महत्त्वपूर्ण चाचणी आहे.

रेझ्यूरॉकला यूएस एफडीए ने (२०२१ मध्ये) आणि भारतातील सीडीएससीओ ने (२०२४ मध्ये) रॉकस्टारच्या सुरक्षा आणि कार्यक्षमतेच्या परिणामांवर आधारित मान्यता दिली होती - रॉकस्टार हे सिस्टमिक उपचाराचे दोन ते पाच आधीचे प्रकार देण्यात आलेल्या सीजीव्हीएचडी ने पीडित रूग्णांमध्ये रेझ्यूरॉकची एक यादृच्छिक, ओपन-लेबल, बहुआयामी खूप महत्त्वपूर्ण चाचणी आहे. रेझ्यूरॉकएँ २०० मिलीग्राम दररोज एकदा (तोंडी) दिले गेल्यावर त्याने ७४% चा एकंदर प्रतिसाद दर (ओआरआर) गाठला आणि सीजीव्हीएचडी च्या क्षेत्रांमध्ये तगडा आणि टिकाऊ प्रतिसाद दर्शविला आहे. हे सुरक्षित आहे आणि चांगल्या प्रकारे सहन केले जाते आणि याच्या प्रतिकूल घटना कॉर्टिकोस्टेरॉईड्स आणि/किंवा इतर इम्युनोसप्रेसंट्स घेणाऱ्या प्रगत सीजीव्हीएचडीने पीडित रूग्णांमध्ये अपेक्षित असलेल्या घटनांशी सुसंगत आहेत.

रोडोल्फो होझ व्यवस्थापकीय संचालक, सनोफी इंडिया लिमिटेड

सीजीव्हीएचडीने पीडित लोकांना रोजची कामे करताना अशक्त करणारा परिणाम जाणवतो. याने पीडित लोकांसाठी उपचारांचे पर्याय खूप मर्यादित आहेत. प्रतिरोपण परिस्थितीक व्यवस्थेतील अपूर्ण वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी आणि या गंभीर अवस्थेतील रूग्णांसाठी महत्वपूर्ण उपचार प्रदान करण्यासाठी आमचे समर्पण या महत्वपूर्ण टप्प्यामुळे दिसून येते. प्रतिक्षमताशास्त्र (इम्युनॉलॉजी) आणि प्रतिरोपण सेवा (ट्रान्सप्लांट केअर) क्षेत्रात रेझ्यूरॉकएँ सादर केल्याने सनोफी इंडियाचे नेतृत्व अधिक बळकट झाले आहे.

## न्यूरोबिऑनच्या 'सबसे बडा बी' मोहिमेत व्हिटॅमिन-बी चे फायदे स्पष्ट केले गेले आहेत

### अमिताभ बच्चन यांनी व्हिटॅमिन-बी ची कमतरता आणि त्याचे आरोग्यावर होणारे परिणाम, यावर संवाद साधला




मुंबई, दि. १० : जवळपास निम्म्या भारतीय मोठ्या व्यक्तींना मुंग्या येणे, सुन्न होणे आणि अशक्तपणा या व्हिटॅमिन-बी च्या कमतरतेच्या लक्षणांपासून त्रास होत असतो. नस खराब असल्यामुळे हे उद्भवू शकते आणि ही स्थिती पेरिफेरल न्यूरोपॅथी म्हणून ओळखली जाते. विशेष म्हणजे, ही सूक्ष्म लक्षणे बऱ्याचदा ओळखली जात नाहीत, परिणामी लाखो लोकांना नस खराब होण्याचा त्रास होतो. याकडे दुर्लक्ष केले गेले, तर व्हिटॅमिन-बी च्या कमतरतेमुळे गंभीर परिणाम होऊन दैनंदिन जीवन, शारीरिक क्षमता आणि झोपेच्या गुणवत्तेवर लक्षणीय परिणाम होतो आणि परिणामी नस खराब झाल्याने अपंगत्व येते आणि हालचाल क्षमता बिघडते.

न्यूरोबिऑन हा भारताचा १ नर्व्ह केअर ब्रँड आहे आणि त्याने निरोगी नस राखण्याच्या महत्त्वाबद्दल लोकांना शिक्षित करण्याचे उद्दीष्ट ठवलेले आहे आणि 'सबसे बडा बी' ही आपली नवीन मोहीम सुरू केली आहे. व्हिटॅमिन बी चे फायदे आणि नस खराब होण्याची सुरुवात होण्याच्या लक्षणांभोवती ज्ञानाची दरी भरून काढण्यासाठी प्रयत्ने सुरु आहेत आणि ही मोहीम त्यात एक पुढचे पाऊल आहे. प्रेमाने 'बिग-बी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या महानायक श्री. अमिताभ बच्चन यांच्यासोबत या मोहिमेत सामान्य व्हिटॅमिन-बी गोळ्यांच्या तुलनेत न्यूरोबिऑनच्या ३पट व्हिटॅमिन-बी च्या सामर्थ्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

न्यूरोबिऑन फोर्ट व्हिटॅमिन-बी ची कमतरता आणि त्याची लक्षणे दूर करण्यास मदत करते. यात बी१२, बी६ आणि बी३ सह ६ आवश्यक बी-जीवनसत्वांचे शक्तिशाली संयोजन असून ते नसीच्या आरोग्याच्या समस्या आणि मुंग्या येणे, सुन्न होणे आणि अशक्तपणा यासारख्या त्याच्याशी संबंधित लक्षणांपासून आराम देण्यास मदत करते. यात व्हिटॅमिन-बी ची कमतरता मुळाशी दूर करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी आवश्यक बी-जीवनसत्वांची अद्वितीय ३पट शक्ती आहे आणि यामुळे न्यूरोबिऑन फोर्ट वेगळे उठून दिसते. या महत्त्वपूर्ण पोषण संबंधीच्या अंतराकडे लक्ष देऊन, ब्रँड इष्टतम नसीला स्वस्थ ठेवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावून व्यक्तींना त्यांच्या कल्याणावर नियंत्रण मिळवू देत आहे.

## फायबरवेब इंडिया लिमिटेडने नोंदवली ९M FY२५ निव्वळ नफ्यात १६७% वार्षिक वाढ

मुंबई, दि.११ : फायबरवेब (इंडिया) लिमिटेड (NSE - FIBERWEB & BSE - ५०७९१०), १००% ईओयू आणि नॉन-वोव्हन फॅब्रिक्स उत्पादक कंपनीने Q३ आणि ९M FY२५ चे अनऑडिटेड निकाल जाहीर केले आहेत.

प्रमुख आर्थिक ठळक मुद्दे

Q3 FY२५

* एकूण उत्पन्न २५.२१ कोटी, वार्षिक वाढ ६८.६४%
* EBITDA ५.५२ कोटी, वार्षिक वाढ १६५.३४%
* EBITDA मार्जिन २१.९०%, वार्षिक वाढ ७९८ बेसिस पॉइंट्स
* निव्वळ नफा ३.५५ कोटी, वार्षिक वाढ १३०.११%
* निव्वळ नफा मार्जिन १४.०८%, वार्षिक वाढ ३७६ बेसिस पॉइंट्स
* डायल्यूटेड ईपीएस १.२३, वार्षिक वाढ १२७.७८% 9M FY25
* एकूण उत्पन्न ७६.४२ कोटी, वार्षिक वाढ १५.८९%
* EBITDA १५.७२ कोटी, वार्षिक वाढ १२६.३५%
* EBITDA मार्जिन २०.५७%, वार्षिक वाढ १,००४ Bps
* निव्वळ नफा ९.९९ कोटी, वार्षिक वाढ १६६.७८%
* निव्वळ नफा मार्जिन १३.०७%, वार्षिक वाढ ७४० Bps
* डायल्यूटेड EPS ३.४७, वार्षिक वाढ १६६.९२%

आमच्या धोरणात्मक उपक्रमांची प्रभावीता आणि कार्यक्षमतेमुळे आम्ही आर्थिक कामगिरीत चांगले यश मिळवले आहे, असे फायबरवेब (इंडिया) लिमिटेडचे संचालक श्री. भावेश पी. शेठ यांनी सांगितले. ९M² FY२५ साठी निव्वळ नफ्यातील १६७% वार्षिक वाढ ही आमची शाश्वत वाढ साध्य करण्याची आणि मजबूत मार्जिन टिकवून ठेवण्याची क्षमता दर्शवते. या वाढीत योगदान देणारे अनेक प्रमुख घटक आहेत, ज्यामध्ये विविध उद्योगांमध्ये न विणलेल्या कापडांच्या मागणीतील वाढ, सुधारित उत्पादन मिश्रण आणि कार्यक्षमतेत वाढ यांचा समावेश आहे. जैवविघटनक्षम सामग्रीसह स्पनलेस फॅब्रिक्समध्ये आमचा विस्तार हा भविष्याची तयारी करणारे नाविन्यपूर्ण पाऊल असून, २०० कोटींच्या निधी उभारणीतून याला पाठबळ मिळाले आहे.

आमच्या पतमानांकनाच्या पुनरुच्चारणामुळे आमची आर्थिक स्थिरता आणि आमच्या भागधारकांचा आत्मविश्वास अधोरेखित होतो. कच्च्या मालाचे स्रोत अनुकूलित करणे, उच्च नफ्याच्या विभागांमध्ये विस्तार करणे आणि अर्थव्यवस्थेच्या प्रमाणाचा लाभ घेणे यामध्ये आमच्या क्षमतेमुळे नफा वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भविष्यात, आम्ही नावीन्य, कार्यक्षमतेतील उत्कृष्टता आणि बाजारातील अंतर्दृष्टी यामध्ये आमच्या सामर्थ्यांचा उपयोग करून शाश्वत वाढ साध्य करण्यासाठी कटिबद्ध आहोत. उत्पादनांच्या ऑफरिंगचा विस्तार करणे आणि उद्योगातील अनुकूल घटकांचा लाभ घेणे यावर तीव्र लक्ष केंद्रित करून, आमच्या धोरणात्मक उपक्रमांनी दीर्घकालीन मूल्य निर्माण करणे सुरू ठेवले जाईल आणि नॉन-वोव्हन फॅब्रिक्स उद्योगातील आघाडीचा खेळाडू म्हणून आमची भूमिका मजबूत होईल, याचा आम्हाला विश्वास आहे.

## बँक ऑफ बडोदाद्वारे मराठी भाषेत व्हाट्सएप बँकिंग सेवेचा शुभारंभ

भारतातील आघाडीच्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या बँक ऑफ बडोदाने आता आपल्या ग्राहकांना मराठी भाषेतही व्हॉट्सऐप बँकिंग सेवा उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकांना त्यांच्या पसंतीच्या भाषेत बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या बँकेच्या उपक्रमाचा एक भाग म्हणून, महाराष्ट्रासह देशभरातील मराठी भाषिक आणि वाचक ग्राहकांना आता व्हॉट्सऐप बँकिंगच्या मराठी आवृत्ती द्वारे निवडक बँकिंग सेवांचा लाभ घेता येणार. मराठी च्या अगोदर ही सेवा हिंदी, इंग्रजी आणि गुजराती भाषेत पण उपलब्ध आहे. बँकेचे विद्यमान किंवा इतर ग्राहक, त्यांच्या मोबाईल नंबर वरून हळ टाइप करून आणि ८४३३८८८७७७ वर संदेश पाठवून या सेवेसाठी नोंदणी करू शकतात. नोंदणी केल्यानंतर, ग्राहक मप्रोफाइलफ मध्ये जाऊन मभाषाफ पर्याय निवडून उपलब्ध भाषा पर्यायांमधून त्यांच्या पसंतीची भाषा निवडू शकतात. बँक लवकरच इतर भारतीय भाषांमध्ये व्हॉट्सॲप बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने काम करीत आहे. बँकेचे विद्यमान ग्राहक खात्यातील शिल्लक तपासणे, मिनी स्टेटमेंट आणि चेक बुक करिता निवेदन, डेबिट कार्ड ब्लॉक करणे, कर्जाचे स्टेटमेंट इत्यादी इतर तत्काळ सुविधांचा लाभ घेऊ शकतात. ग्राहकांना त्यांच्या भाषेत बँकिंग सेवा उपलब्ध करण्याच्या उद्देशाने विविध डिजिटल चॅनेलद्वारे भारतीय भाषा उपलब्ध करून देण्यासाठी बँक सतत प्रयत्नशील आहेत, हे उल्लेखनीय आहे.

PRIME FOCUS LIMITED

# प्राइम फोकस लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, सिटी बँकेसमोर, लिंकिंग रोड, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२.**
**दूरध्वनी : ०२२ - २६४८४९००**
**वेबसाइट : www.primefocus.com**
**कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981**

**दि. ३१ डिसेंबर, २०२४ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा (स्थायी व एकत्रित) अहवाल**

दि. ३१.१२.२०२४ रोजी संपलेली तिमाही व नऊमाहीकरिताच्या कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांना (स्थायी व एकत्रित) प्राइम फोकस लिमिटेडच्या (कंपनी) संचालक मंडळाद्वारे सोमवार, दि. १०.०२.२०२५ रोजी आयोजित सभेमध्ये मान्यता देण्यात आली आहे.

मर्यादित पुनरावलोकन अहवालासमवेत वरील वित्तीय निष्कर्ष हे कंपनीची वेबसाइट https://www.primefocus.com/financial-results-conclusion-meeting-board-directors वर तसेच स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com व www.nseindia.com वर उपलब्ध आहेत तसेच ते क्यूआर कोड स्कॅन करूनही प्राप्त करता येऊ शकतील.

प्राइम फोकस लिमिटेड करिता
सही/-
नरेश मल्होत्रा
अध्यक्ष व पूर्णवेळ संचालक
डीआयएन : ०००४५९७

दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२५
ठिकाण : मुंबई

वरील माहिती ही भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४७ नुसार आहे.

## 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबविण्यासाठी नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुयोग्य नियोजन



आज ११ फेब्रुवारीपासून १२ वीची उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा सुरु झाली असून १८ मार्चपर्यंत चालणाऱ्या या परीक्षा तसेच १० वीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणा-मध्ये सुरळीत पार पाडण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने संपूर्ण तयारी केली असून त्या अनुषंगाने मुख्यमंत्री ना.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीव्दारे झालेल्या विशेष बैठकीत परीक्षा काळात कोणताही गैरप्रकार घडणार नाही याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी मौलिक सूचना करीत निर्देश दिले. या दूरदृश्य प्रणालीव्दारे झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री ना.श्री. एकनाथ शिंदे व ना.श्री.अजित पवार, शिक्षणमंत्री ना.श्री. दादा भुसे यांनीही मार्गदर्शन केले.

या बैठकीच्या अनुषंगाने महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी महापालिका शिक्षण विभागास १२ वीच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडण्याकरिता आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश दिले. याकरिता नियंत्रण अधिकारी म्हणून शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांची नियुक्ती केली असून त्यांच्यासह शिक्षणाधिकारी व केंद्र समन्वयक अधिकारी यांनी विविध परीक्षा केंद्रांना भेटी देऊन तेथील व्यवस्थेची पाहणी करण्याचे निर्देशित केले आहे. कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत ३ भरारी पथके व २ बैठ्या पथकांची स्थापना करण्यात आली असून त्यामध्ये १५ अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## परतून येत आहे जगातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय मंदिर अधिवेशन आणि प्रदर्शन

मुंबई, दि.११ : मंदिर प्रशासन आणि व्यवस्थापनासाठी समर्पित जगातील सर्वात मोठे संमेलन, आंतरराष्ट्रीय मंदिर अधिवेशन आणि प्रदर्शन (आयटीसीएक्स) २०२५, १७-१९ फेब्रुवारी दरम्यान तिरुपती येथील आशा कन्वेन्शन्स येथे आयोजित होणार आहे. अंत्योदय प्रतिष्ठानच्या सहकार्याने टेम्पल कनेक्टने आयोजित केलेले, मआयटीसीएक्स २०२५फ हिंदू, शीख, बौद्ध आणि जैन संस्थांना एकत्र करेल आणि त्यांच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे उत्सव साजरा करताना जगभरातील मंदिर परिसंस्थांना एकमेकांसोबत जोडण्यासाठी,त्यांना बळकट आणि त्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी एक गतिमान व्यासपीठ प्रदान करेल. यामध्ये ५८ देशांमधील सुमारे १५८१ भक्ती संस्थांचा सहभाग असेल आणि प्रदर्शनामध्ये १११ हून अधिक वक्ते, १५ कार्यशाळा आणि ज्ञान सत्रे आणि ६० हून अधिक दुकाने असतील.

'मंदिरांचा महाकुंभ' - आयटीसीएक्सफ ही भारतीय परंपरेच्या मंदिरांबद्दल माहितीचे दस्तऐवजीकरण आणि डिजिटलायझेशन करण्यासाठी एक अग्रगण्य व्यासपीठ असलेल्या टेम्पल कनेक्टचे संस्थापक गिरीश कुलकर्णी आणि आंतरराष्ट्रीय मंदिर अधिवेशन आणि प्रदर्शनाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र विधान परिषदेचे मुख्य प्रतोद प्रसाद लाड यांची कल्पना आहे. भक्तांचा अनुभव आणि सुविधा वाढवणे हे या आवृत्तीचे केंद्रबिंदू आहे, आकर्षक, सक्षम आणि उन्नत करणे म या त्याच्या मुख्य कल्पनेशी सुसंगत आहे.

आयटीसीएक्स २०२५ मंदिर प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि उद्योग तज्ञ यांच्यात जागतिक सहकार्य सुलभ करेल, जे प्रामुख्याने धर्म किंवा धार्मिक पैलूंच्या पलीकडे जाऊन प्रगतीशील मंदिर व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करेल. ज्ञान-आदान प्रदान करण्याचा एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणून, यात मुख्य भाषणे, पॅनेल चर्चा, कार्यशाळा आणि मास्टरक्लासेस असतील ज्यात मंदिर व्यवस्थापन आणि धार्मिक यात्रींसाठी अनुभव वृध्दीकरणासोबत विविध महत्त्वाच्या पैलूंचा समावेश असेल.

याअंतर्गत निधी व्यवस्थापन आणि गर्दी नियंत्रणापासून ते शाश्वतता आणि सुरक्षा शिष्टाचार, एआय, डिजिटल साधने आणि फिनटेक तंत्रज्ञानाद्वारे मंदिर व्यवस्थापनाचे आधुनिकीकरण करण्यासारख्या विषयांवर विशेष भर दिला जाईल. लंगर आणि अन्न वितरण प्रणाली, कचरा व्यवस्थापन आणि पुनर्वापर, शाश्वत ऊर्जा पद्धती आणि कायदेशीर अनुपालन यांसारख्या विषयांवर मुखत्वे लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. अधिक कार्यक्षम आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावी मंदिर परिसंस्था तयार करण्याच्या उद्देशाने चर्चांमध्ये वैद्यकीय मदत, शैक्षणिक कार्यक्रम आणि धर्मादाय उपक्रम यासारख्या आवश्यक सामुदायिक सेवांचा देखील समावेश असेल.

जे ममंदिर अर्थव्यवस्थेला